# प्रेस नोट    दि. ०९/१०/२०२६

# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## ३० वी नवी मुंबई विभागीय वार्षीक पोलीस क्रीडा स्पर्धा सन- २०२६

३० वी नवी मुंबई विभागीय वार्षिक पोलीस क्रीडा स्पर्धा - २०२६ चे आयोजन पोलीस मुख्यालय, परेड मैदान,कळंबोली नवी मुंबई येथे दिनांक ०७/१०/२०२६ ते दिनांक ०९/१०/२०२६ या कालावधीत करण्यात आले. सदर स्पर्धेत नवी मुंबई आयुक्तालयातील परिमंडळ -०१, परिमंडळ -०२, परिमंडळ -०३ व मुख्यालय अशा चार संघांचा समावेश होता. चार संघ मिळुन एकुण ८८ खेळाडु सहभागी झाले होते. त्यामध्ये पुरुष-५८, महिला -३० खेळाडुंचा समावेश होता. स्पर्धेमध्ये पुरुष विभागामध्ये ०८ सांघिक तर ०९ वैयक्तीक क्रीडा प्रकार होते तसेच महिला विभागामध्ये ०५ सांघिक व ०९ वैयक्तिक क्रीडा प्रकारांचा समावेश होता.

दि. ०७/१०/२०२६ रोजी ३०वी विभागीय वार्षिक पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२६ च्या पहिल्या दिवशी हॉकी, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, खो-खो, कुस्ती, ज्युदो, ॲथलेटीक्स या क्रीडा प्रकारात १००००मी. धावणे (पुरुष/महीला), १५००मी. धावणे (पुरुष/महीला), ४x१००मी. रिले (पुरुष/महीला), गोळा फेक (पुरुष/महीला), ४००मी. धावणे (पुरुष/महीला), उंच उडी (पुरुष/महीला), हातोडा (पुरुष/ महीला) या स्पर्धा पार पाडण्यात आल्या. दि. ०७/१०/२०२६ रोजी ३०वी विभागीय वार्षिक पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२६ची सुरुवात १००००मी. धावणे पुरुष या क्रीडा प्रकाराने झाली आहे. मा. श्री. मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त सो नवी मुंबई, मा. श्री. दीपक साकोरे पोलीस सह आयुक्त सोा नवी मुंबई, मा. श्री. प्रमोद शेवाळे अप्पर पोलीस आयुक्त सो (गुन्हे) नवी मुंबई यांचे अधिपत्याखाली. मा. श्री. विशाल ठाकुर पोलीस उपआयुक्त सो (मुख्यालय ) नवी मुंबई, यांचे मार्गदर्शनाखाली, मा. श्री.बजरंग देसाई सहा. पोलीस आयुक्त सो. (प्रशासन) ,मा. श्री. शांताराम वाघमोडे राखीव पोलीस निरीक्षक मुख्यालय नवी मुंबई, ॲथलेटिक्स संघटनेचे जिल्हा सचिव प्रविण खुटारकर, कदिरवहण नाडार, हर्षद पाटील, पोहवा/१०३७ संपत्ती येळकर क्रीडा विभाग प्रमुख नवी मुंबई पोलीस यांच्या शुभहस्ते मैदानाचे पूजन करुन सदर क्रीडा स्पर्धेची सुरवात करण्यात आली. उदघाटन प्रसंगी सर्व खेळाडू व पोलीस अधिकारी, अंमलदार उपस्थित होते. दि. ०७/१०/२०२६ रोजी पोलीस मुख्यालय, नवी मुंबई येथे ३०वी वार्षिक पोलीस क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी संघानी व त्यामधील खेळाडूंनी वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकारात सर्वोत्तम कामगिरी करून प्रथम व व्दितीय क्रमांक पटकावून यश संपादन केलेले आहे. सदर क्रीडा स्पर्धेच्या पहिल्या दिवशी गुणतालिकेत पोलीस मुख्यालय हा संघ प्रथम क्रमांकावर असून सध्यस्थितीला पोलीस मुख्यालय संघाचे वर्चस्व दिसून येत आहे.

आज दि. ०९/१०/२०२६ रोजी ३० वी नवी मुंबई विभागीय वार्षिक पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२६ चा सांगता समारोपाची सुरुवात ४x१०० मी. रिले (पुरुष/महीला),या क्रीडा प्रकाराने झाली. स्पर्धेच्या समारोप मा.श्री. मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त सोा नवी मुंबई यांचे मागदर्शनाखाली समारोप समारंभा करीता सन्माननिय प्रमुख, मा.श्री. दीपक साकोरे, पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई, मा. श्री. प्रमोद शेवाळे, अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे), नवी मुंबई, तसेच कार्यक्रमाकरीता मा.श्री. विक्रांत पाटील, आमदार, विधानपरीषद, मा. महापौर सौ. सुजाता पाटील, नवी मुंबई महानगर पालीका, यांनी उपस्थिती दर्शवीली. मा.श्री.विशाल ठाकुर, पोलीस उपआयुक्त ( मुख्यालय ) नवी मुंबई, यांनी प्रास्ताविक केले. ॲथलेटिक्स संघटनेचे जिल्हा सचिव प्रविण खुटारकर यांनी, ४x१०० रिले स्पर्धा स्पर्धेला सुरवात केली. ४x१०० या अटितटीच्या स्पर्धेमध्ये परिमंडळ-२ पुरुष संघाने आणि महिलांच्या पो.मुख्यालय संघाने प्रथम क्रमांक मिळवला या प्रसंगी सर्व खेळाडू व मा. वरिष्ठ पोलीस अधिकारी, तसेच सर्व मा.पोलीस उप

आयुक्त, मा. पोलीस सहा पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते. दि. ०९/१०/२०२६ रोजी पोलीस मुख्यालय, नवी मुंबई येथे वार्षिक पोलीस क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी संघानी व त्यामधील खेळाडूंनी वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकारात सर्वोत्तम कामगिरी करून प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावून यश संपादन केलेले आहे. तसेच संपुर्ण स्पर्धेत सर्वोत्कृष्ट पुरूष खेळाडु म्हणुन पोशि/३१३० सुजित पाटील व सर्वोत्कृष्ट महीला खेळाडु म्हणुन मपोशि/५१५२ श्रद्धा जाधव यांना गौरविण्यात आले.

तसेच पो. अधिकारी यांचे बॅडमिंटन क्रीडा प्रकारात १)वपोनि/श्री.सचिन दंताळ - मोपवि, नवी मुंबई यांनी प्रथम क्रमांक २) वपोनि/श्री. देविदास कठाळे, रबाळे एमआयडीसी पो.ठाणे, नवी मुंबई यांनी द्वितीय क्रमांक त्याच प्रमाणे ५ कि.मी. चालणे या क्रीडा प्रकारात १) वपोनि/जगदिश शेलकर, उरण पो. ठाणे, नवी मुंबई यांनी प्रथम क्रमांक २) रापोनि/श्री. शांताराम वाघमोडे - पो. मुख्यालय, नवी मुंबई यांनी द्वितीय क्रमांक ३) वपोनि/श्री. महेश सरतापे - कळंबोली वाहतुक शाखा, नवी मुंबई यांनी तृतीय क्रमांक व ७ कि. मी. चालणे या क्रीडा प्रकारात १) वपोनि/श्री. संजय जोशी - खारघर पो. ठाणे, नवी मुंबई यांनी प्रथम क्रमांक पटकविला असुन त्यांना मा. श्री. दीपक साकोरे पोलीस सह आयुक्त सो। नवी मुंबई आणि मा. महापौर सौ. सुजाता पाटील यांचे हस्ते बक्षिस वितरण करणेत आले.

सदर क्रीडा स्पर्धेच्या तीसऱ्या दिवशी गुणतालिकेत पोलीस मुख्यालय हा संघाने प्रथम क्रमांक मिळवुन विजेतेपद पटकाविले आहे. मा.श्री.बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो. (प्रशासन), यांनी आभार प्रदर्शन केले.